MHPU180006612010

**<u>निशाणी क्र. २७९ वरील आदेश</u>**
(दिनांक ०८.११.२०२३)

१. वादीतर्फे प्रस्तुत अर्ज दावा दुरुस्ती करीता व प्रतिवादी क्र.१९ श्री. बापुराव नबाजी कोकणे यांनी त्यांच्या बहिणी (१) कै. बायजाबाई उर्फ कृष्णाबाई भाऊसाहेब खटके या दि.०४.०४.२०२२ मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस खालीलप्रमाणे आहेतः-

१) **श्री. बाळासाहेब भाऊसाहेब खटके – मुलगा,**
वय – ५५ वर्षे, धंदा – शेती,
रा. मुंजवडी, ता. फलटण, जि. सातारा.

२) **श्री. प्रकाश भाऊसाहेब खटके – मुलगा,**
वय – ५० वर्षे, धंदा – शेती,
रा. मुंजवडी, ता. फलटण, जि. सातारा.

२. तसेच दुसरी बहीण हिराबाई शांताराम धायतोंडे, वय – ६३ वर्षे, धंदा – घरकाम, रा. मोहाडी, ता. धुळे, जि. धुळे व तिसरी बहीण राधा विठ्ठल मराठे, वय – ६० वर्षे, धंदा – घरकाम, रा. कल्याण, ता. ठाणे, जि. ठाणे यांची नावे ७/१२ ला लावलेली आहेत. सदरची नावे प्रतिवादी क्र. १९ यांनी मुद्दामहुन ७/१२ ला लावली आहे. त्यामुळे वादींना सदरचा दावा दुरुस्त करणे भाग पडले आहे. त्यामुळे वादी दाव्यात प्रतिवादी क्र. ४९ नंतर ५० म्हणुन कै. बायजाबाई उर्फ कृष्णाबाई भाऊसाहेब खटके (मयत) यांचे वारस

५०अ) **श्री. बाळासाहेब भाऊसाहेब खटके,**
वय – ५५ वर्षे, धंदा – शेती,
रा. मुंजवडी, ता. फलटण, जि. सातारा.

५०ब) **श्री. प्रकाश भाऊसाहेब खटके,**
वय – ५० वर्षे, धंदा – शेती,
रा. मुंजवडी, ता. फलटण, जि. सातारा.

५१) **हिराबाई शांताराम धायतोंडे,**
वय – ६३ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. मोहाडी, ता. धुळे, जि. धुळे

५२) **राधा विठ्ठल मराठे,**
वय – ६० वर्षे, धंदा – घरकाम,
रा. कल्याण, ता. ठाणे, जि. ठाणे.

अशी दाव्यात प्रतिवादी म्हणुन दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी. ते

दाव्यात आवश्यक पक्षकार आहे त्यामुळे त्यांना दाव्यात प्रतिवादी करणे गरजेचे आहे. या कारणास्तव वादीने प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जास दाव्यातील विरोधक प्रतिवादी यांनी त्यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी जबाब दाखल केला नसल्यामुळे विरोधम प्रतिवादीविरुध्द विनाजबाबाचा आदेश मी केलेला आहे.

४. अर्ज वाचला. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एच. डी. भोईटे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. वादींनी त्यांच्या कथनाप्रित्यर्थ नि.२८२ यादीलगत गट क्र.७३/१/अ व ७३/२/अ चे ७/१२ उतारे व फेरफार क्र.२९७१ यांच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच नि.३२१ यादीलगत नि.३२२ अन्वये कृष्णाबाई भाऊ खटके यांचे मृत्यु प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५. नि.३२२ अन्वये दाखल मृत्यु प्रमाणपत्रावरुन असे दिसुन येते की, कृष्णाबाई भाऊ खटके या दि.०४.०४.२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तुत अर्ज दि. २९.०९.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. दाव्याचे कामकाज पुढे चालविण्यासाठी तसेच गुणदोषावर दाव्याचा निकाल होणेकामी प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचे कामकाज होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादींची विनंती मंजुर करण्यात येते. करिता मी खालील आदेश करीत आहेः–

## आदेश

१. वादींचा नि.२७९ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांच्या आत दाव्यात प्रतिवादी क्र.५० म्हणुन बायजाबाई उर्फ कृष्णाबाई भाऊ खटके–मयत चे वारस म्हणुन प्रतिवादी क्र.५०अ, ५०ब, तसेच अर्जात नमुद पक्षकार क्र.५१ व ५२ यांना समाविष्ट करावे. त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करावी तसेच दुरुस्त दाव्याच्या प्रती अभिलेखावर दाखल कराव्यात व त्याच्या प्रती इतर प्रतिवादींना दाव्यात.

३. दुरुस्त दाव्याच्या प्रती दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.५०अ, ५०ब, ५१ व ५२ यांना समन्स पाठविण्यात येतील.

सही/–

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]

दिवाणी न्यायाधीश क. स्तर (न्या.क्र. १),

ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाण– दौंड

दिनांक– ०८.११.२०२३

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>C.J.J.D. & J.M.F.C. (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 08.11.2023. |
| Order singed by the<br>Presiding Officer on | :- | 08.11.2023. |
| Order uploaded on | :- | 08.11.2023. |